!! ज्ञानदीप लावू जगी !!

**Aadishakti Dhandai Mata Shikshan Prasarak Sanstha's**

# Late Annasaheb R. D. Deore Arts and Science College

## Mhasadi, Tal. Sakri, Dist. Dhule (MS).

NAAC Accredited B+ Grade (CGPA2.52)



# शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४
# वार्षिक अहवाल

## विदयार्थी विकास विभाग

**शैक्षणिक वर्ष – २०२३-२४**

# विदयार्थी विकास विभाग

## शैक्षणिक वर्ष 2023 -2024 वार्षिक अहवाल

**कबचौ,उ.म.विदयापीठ** अंतर्गत **विदयार्थी विकास विभागामार्फत** राबविण्यात येणा-या व **स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविदयालयाने** सहभाग घेतलेल्या विविध उपक्रमांचा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद होत आहे.

शैक्षणिक वर्ष **2023-2024** मधील विदयार्थी विकास विभागाची प्रथम सभा मा.प्राचार्य प्रो. संजीव बी. गिरासे यांच्या अध्यक्षतेखाली दि.15/08/2022 रोजी घेण्यात आली. सभेत मागील शैक्षणिक वर्षाचा कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच मागिल वर्षी विभागा मार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळांचा यशस्वीतेबाबत समाधान व्यक्त् करुन नुतन शैक्षणिक वर्ष असेच उपक्रम राबवावेत असे मत व्यक्त् करण्यात आले. तसेच विदयार्थी हित लक्षात घेता विदयापीठा मार्फत गरीब होतकरु विदयार्थ्याना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी पात्र विदयार्थ्यांचे अर्ज मागविण्याचे परवानगी देण्यात आली. त्याच प्रमाणे विदयापीठ स्तरीय विविध कार्यशाळा, अविष्कार,युवारंग इ.सारख्या उपक्रमात जास्तीत जास्त् विदयार्थ्यांना सहभागी करुन त्यांचा कला गुणांना वाव मिळावा असे ठरविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष **2023-2024** मध्ये विदयार्थी विकास विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचा अहवाल पुढील प्रमाणे.

1- **कमवा व शिका योजना** : महाविदयालयात गरीब व होतकरु विदयार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या कमवा व शिका योजने साठी विदयापीठ परीपत्रकानुसार दहा विदयार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यास मा.प्राचार्यांच्या शिफारशीने प्रस्ताव तयार करुन विदयापीठाकडे पाठविण्यात आला. या उपक्रमात सहभागी विदयार्थ्यांनी माहे ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२४ या दरम्यान मध्ये महाविदयालय परीसरात बागकाम, रोपलागवड, झाडांना पाणी देणे ,परीसर स्वच्छता ,ग्रथालयीन कामे ,विज्ञान विभागातील प्रयोगशाळा स्वच्छता,कार्यालयीन उपयुक्त् कामे इ.कामकाज केले.त्यांचा कामाचा मेहनाताना म्हणुन **146160**/- रुपये एकूण 10 निवड झालेल्या विध्यार्थांच्या बँक खाती सदर रक्कम वर्ग करून कार्यपूर्ती अहवाल विदयार्थी विकास विभागास सादर करण्यात आला. व त्याच प्रमाणे सेन्ट्रल ऑडीट सुद्धा पूर्ण करून विदयार्थी विकास विभागास सादर करण्यात आला.

2- **आर्थिक दुर्बल घटक योजना** : विदयापीठामार्फत अपंग,अनाथ,गरीब विदयार्थ्यांसाठी देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसाठी महाविदयालयातील 15 विदयार्थ्यांची निवड करण्यात येवुन तसा प्रस्ताव विदयापीठ विदयार्थी कल्याण विभागात पाठविण्यात आला. या योजनेखाली **15** विदयार्थ्यांना विदयापीठाकडुन /- रुपये मंजुर करण्यात आले व त्याप्रमाणे विध्यार्थांच्या बँक खाती सदर रक्कम वर्ग करून कार्यपूर्ती अहवाल विदयार्थी विकास विभागास सादर करण्यात आला.

3- **आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळा** -शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला विदयापीठ परीपत्रकानुसार महाविदयालयाने 02 कार्यशाळा आयोजनासाठीचे प्रस्ताव विदयापीठाकडे

सादर केले. त्यात साहस कार्यशाळा, युवतीसभे अंतर्गत आत्मनिर्भर युवती अभियान आयोजनास विदयापीठाने परवानगी दिली.

## ✓ तीनदिवशीय साहस कार्यशाळा अहवाल
## दि.05/03/2024 ते दि.07/03/024

✓

दि. 05/03/2024 ते दि.07/03/024 दरम्यान विदयार्थी विकास विभाग कबचौ उ.म.विदयापीठ जळगांव पुरस्कृत व स्वर्गीय अण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविदयालय म्हसदी आयोजित **तीनदिवशीय साहस कार्यशाळा** आमच्या महाविदयालयात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत धुळे, व नंदुरबार या दोन जिल्हातील वेगवेगळ्या महाविदयालयातुन आलेले **एकुण 152** विदयार्थ्यांनी उत्साहपुर्वक सहभाग नोंदवला.

✓ या तीनदिवशीय साहस कार्यशाळेचे उदघाटन दि. 05/03/2024 रोजी सकाळी ठिक 10.00 वाजता **मा. प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी (कुलगुरू, कबचौ.उमवि, जळगाव)** यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. **उदघाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.दादासो.संजयकुमार आर. देवरे** हे उपस्थित होते. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन मा. दादासो. सुभाष गजमल देवरे अध्यक्ष-धनदाई देवी तरूण ऐक्य मंडळ म्हसदी तसेच प्रमुख उपस्थिती म्हणुन उपप्राचार्य डॉ. शिवाजी बी. पाटील सदस्य,व्यवस्थापन परिषद क.ब.चौ. उ.म.वि.जळगाव, महाविदयालयाचे माजी प्राचार्य डॉ.सु.रु.पाटील व प्राचार्य प्रो. संजीव बी. गिरासे उपस्थित होते.

✓ या तीनदिवशीय साहस कार्यशाळेचे आयोजन प्रत्येक दिवशी एकुण 4 सत्रात करण्यात आले होते. प्रथम दिवशी **दि. 05/03/2024** सकाळी प्रथम सत्रात नाव नोंदणी व ठिक 11.00 वाजता उदघाटन **कुलगुरू, मा. प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी** यांचा हस्ते करण्यात आले. त्यानंतर द्वितीय सत्रात 11.30 ते 1.00 दरम्यान साक्री येथील एस. आय. टी. कॉलेजचे प्राचार्य कारभारी आर. ठाकरे यांनी **"आपत्ती आणि निवारण"** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर 1.00 ते 2.00 दरम्यान सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला. तृतीय सत्रात 2.00 ते 3.50 दरम्यान साक्री येथील एस. आय. टी. कॉलेजचे प्रा. सुनील एन. पानपाटील यांनी **"आग आणि उपाय"** या विषयावर सर्व विदयार्थ्यांना मार्गदर्शन व प्रात्यक्षिक सादर केले. त्यात त्यांनी साहसी प्रात्यक्षिका द्वारे विदयार्थीना मंत्रमुग्ध् केले. चतुर्थ सत्रात 3.30 ते 5.00 दरम्यान साक्री तालुका क्रीडा मार्गदर्शन श्री धनंजय एल. सोनवणे यांनी **"ट्रेकिंग आणि साहस"** या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच **"डोंगर सफर"** करून सर्व विदयार्थ्यांना ट्रेकिंगचे प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. संध्याकाळी विविध महाविद्यालयातुन साहस कार्यशाळेत सहभागी झालेल्या सुमारे 152 विदयार्थ्यांची ओळख व गटविभागनी करण्यात आली. विविध विषयावर गट

चर्चा आयोजित करण्यात आली. यातुन विविध महाविदयालातुन आलेल्या विदयार्थ्यांमध्ये परिचय व मैत्री भाव निर्माण झाला. या सत्रानंतर विदयार्थ्यांना विश्राम व भोजन अवकाश देण्यात आला व रात्री 8.00 ते 9.30 दरम्यान विविध विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

✓ साहस कार्यशाळेच्या दुस-या दिवशी दि. 06/03/2024 प्रभातकाळी ठिक 7.00 ते 9.00 दरम्यान योगासन, प्राणायम या विषयावर प्रा.डॉ.जे.पी.तोरवणे क्रिडासंचालक यांनी सत्र बाह्य मोलाचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर अल्पोहार पश्चयात प्रथम सत्रात 10..00 ते 01.00 दरम्यान एस. डी. आर. एफ. टीम प्रमुख मा.श्री.चंद्रकांत पारस्कर व सहकारी यांनी **"आपत्तिव्यवस्थापन"** या विषयावर विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रात एस. डी. आर. एफ. टीमने विविध प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी करून मंत्रमुग्ध केले. त्यानंतर दुपारी 1.00 ते 2.00 सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. तृतीय सत्रात 2.00 ते 3.30 दरम्यान एस. डी. आर. एफ. टीमने विविध प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभागी करून मंत्रमुग्ध केले. त्यानंतर चतुर्थ सत्रात विदयार्थ्यांना परिसरातील **"स्मशानभूमी भेट"** घडवुन आणण्यात आली. या सत्रानंतर विदयार्थ्यांना विश्राम व भोजन अवकाश देण्यात आला. रात्री 8.00 ते 9.30 दरम्यान विविध विषयांवर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

✓ साहस कार्यशाळेच्या तिस-या दिवशी दि. 07/03/2024 रोजी प्रभातकाळी ठिक 7.00 ते 9.00 दरम्यान **"ध्यानसाधना, लाठीप्रशिक्षण व ध्वजप्रशिक्षण"** या अलौकिक विषयावर प्रा.डॉ. जे.पी.तोरवणे व योगेश मासूळे क्रिडासंचालक यांनी सत्र बाह्य मोलाचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर अल्पोहार पश्चयात प्रथम सत्रात 10..00 ते 11.30 दरम्यान सर्व विदयार्थ्यांनी माहाविद्यालयास भेट व फेरी काढण्यात आली. द्वितीय सत्रात 11.30 ते 1.00 दरम्यान विदयार्थ्यांना वन मैत्री व्हावी या हेतूने वनविभाग प्रमुख श्री विनायक कारभारी खैरनार यांनी **"साहसी वन दर्शन"** या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानतर दुपारी 1.00 ते 2.00 सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. तृतीय सत्रात 2.00 ते 3.30 दरम्यान प्रा.डॉ. विवेकानंद एल. चव्हाण धुळे जिल्हा विदयार्थी विकास समन्वयक यांनी **"साहस कार्यशाळा महत्व व काळाची गरज"** या विषयावर विदयार्थ्यांना अतिशय सुंदर दाखले देत मार्गदर्शन केले. त्यानंतर चतुर्थ सत्रात साहस कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी **समारोपकर्ते म्हणुन प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे समन्वयक, विद्यार्थी विकास विभाग**, क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव, तसेच समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रो. संजीव गिरासे व प्रमुख पाहुणे म्हणुन मा.प्रा.सुरेखा पालवे व्यवस्थापन परिषद सदस्य, क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव, मा.प्रा.डॉ.पवित्रा पाटील व्यवस्थापन परिषद सदस्य, क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव, वनविभाग प्रमुख मा.श्री विनायक कारभारी खैरनार, धनदाई देवी तरूण ऐक्य मंडळाचे सचिव मा.महेंद्र दौलत देवरे, प्रा. डॉ. शिवाजी बी. पाटील व्यवस्थापन परिषद सदस्य, क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव, धनदाई देवी तरूण

ऐक्य मंडळाचे अध्यक्ष मा. दादासो. सुभाष गजमल देवरे, धनदाई देवी तरूण ऐक्य मंडळचे संचालक मा. श्री हिम्मत देवरे, मा. श्री दाजी देवरे, मा.श्री के. एन. देवरे आदींच्या उपस्थित समारोप संपन्न झाला.

✓ या तीनदिवशीय साहस कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी मा.प्राचार्य प्रो.संजीव गिरासे संयोजक प्रा.डॉ.विशाल नारायण शिंदे संयोजक समिती सदस्य डॉ. मिलिंदकुमार देवरे, प्रा.डॉ.दीपाली बी. सोनवणे, प्रा.बी.एन. काकडे, प्रा.डॉ.विलास एस. मोर, प्रा.डॉ.गुलाबसिंग पावरा, तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री.रत्नाकर ए. जाधव व विदयार्थीनी प्रतिनिधी सयली सीताराम पाटील व विद्यार्थ्यी प्रतिनिधी दीपक शशिकांत भामरे यांचे सहकार्य लाभले. विदयार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.व्ही.के.साळुंखे यांनी सर्वांचे आभार मानुन राष्ट्रगीताने कार्यशाळेची सांगता करण्यात आली. विदयार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच गट्निहाय प्रोहत्सान बक्षिस वितरण करून विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यशाळेच्या यशस्वीते साठी सर्व शिक्षक, शिक्षेकेतर कर्मचारी, धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे कर्मचारी, कमवा व शिका योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी- विदयार्थीनी इत्यादींचे सहकार्य लाभले.

## ✓ 'आत्मनिर्भर युवती अभियान' अहवाल

✓ स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने युवती सभे अंतर्गत 'आत्मनिर्भर युती अभियान' कार्यशाळेचे आयोजन दिनांक 20 फेब्रुवारी 2024 ते 27 मार्च 2024 या कालावधीत करण्यात आले.

✓ दिनांक 20 फेब्रुवारी 2024 रोजी या अभियानाची सुरुवात क्षेत्रभेटीने करण्यात आली. पाच दिवस राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या पहिल्या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.संजीव गिरासे यांनी सुरुवातीला महाविद्यालयाच्या पटांगणावर सहभागी 50 विद्यार्थ्यींनींना मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्व विद्यार्थिनींना प्राथमिक आरोग्य केंद्र, म्हसदी येथे क्षेत्रभेटीसाठी नेण्यात आले.

✓ प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. जिज्ञासा रमेश अहिरे यांनी सर्व विद्यार्थिनींचे स्वागत करून त्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आरोग्य केंद्रा मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विभागांच्या योजनांची माहिती याप्रसंगी विद्यार्थिनींना दिली. त्यामध्ये ओटीपी, सार्वजनिक प्राथमिक आरोग्य योजना, डीलेव्हरी विभाग, संतती निवारण योजना, इत्यादी विभागांची सविस्तर माहिती दिली.

✓ प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य अधिकारी डॉ. दीपक पाटील यांनी विविध विभागात प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्येक विभागाच्या कामकाजाची माहिती विभाग प्रमुखांच्या मदतीने उपस्थित सर्व विद्यार्थिनींना दिली.

✓ दिनांक 21 फेब्रुवारी 20234 रोजी साक्री येथील स्त्रीरोगतज्ञ डॉ. शितल सुभाष पाटील यांनी विद्यार्थिनींना आरोग्य विषयक मार्गदर्शन करून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत उपयुक्त माहिती दिली.

✓ दिनांक 22 फेब्रुवारी 2024 रोजी सेंट्रल बे◌ॅक ऑफ इंडिया,म्हसदी येथे क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले त्यानुसार विद्यार्थिनींना सेंट्रल बे◌ॅक ऑफ इंडिया येथील बे◌ॅक अधिकारी श्री जितेंद्र शर्मा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी सरकारी योजना, शेती विषयक योजना, आर्थिक व्यवहार, इ. बाबत मार्गदर्शन केले. तसेच विविध विभाग यामध्ये प्रत्यक्ष भेट देऊन विभागांच्या कामकाजाची माहिती विद्यार्थिनींना करून दिली. तसेच या क्षेत्रभेटीत प्रथमच विद्यार्थिनींचा मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष सहभाग बघून विद्यार्थिनींच्या धाडसाचे श्री जितेंद्र शर्मा यांनी कौतुक केले.

✓ दिनांक 23 फेब्रुवारी 2024 रोजी या उपक्रमांतर्गत कायदेविषयक मार्गदर्शन करण्यासाठी धुळे येथील मा. योगेश गुलांबराव भदाणे यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थिनींना आपल्या हक्क व साहसाची जाणीव जागृती यासंदर्भात मार्गदर्शन केले.

✓ दिनांक 26 फेब्रुवारी 2024 रोजी आत्मनिर्भर युती अभियाना अंतर्गत विद्यार्थिनींना वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे येथे क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले. क्युरेटर मा. श्रीपाद माधव नांदेडकर सर यांनी याप्रसंगी उपस्थित विद्यार्थिनींना राजवाडे संशोधन मंडळ व वस्तुसंग्रहालयाची माहिती देताना या मंडळात असलेले ऐतिहासिक कागदपत्रे, त्यांचे वर्गीकरण, मंडळाचा चालविण्यात येणारा दैनंदिन कारभार, मोडी लिपीचे महत्व, वस्तू संग्रहालयात असलेल्या मूर्ती, नाणी इत्यादी बाबत मार्गदर्शन केले.

✓ तसेच विद्यार्थिनींना धुळे जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, जिल्हापरिषद धुळे, श्री समर्थ वाग्देवता मंदिर धुळे येथे क्षेत्रभेट दिली.

✓ दि 27 मार्च 2024. रोजी आत्मनिर्भर युती अभियान कार्यशाळेचा समारोप दामिनी पथक प्रमुख ईला शिवाजी गावीत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थिनींना संकट ओढवल्यास त्याला कश्याप्रकारे सामोरे जावे, कोणती पावले उचलावी याबाबत मार्गदर्शन केले.

✓ आत्मनिर्भर युवती अभियानाच्या यशस्वीते साठी शिक्षक व शिक्षेकेतर कर्मचारी, कमवा व शिका योजनेचे स्वयंसेवक इत्यादींचे सहकार्य लाभले.

**विद्यार्थी विकास अधिकारी** **प्राचार्य**

लोकमत

# आत्मनिर्भर युवती अभियान कार्यशाळा

**म्हसदी :** अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग पुरस्कृत युवती सभेंतर्गत आत्मनिर्भर युवती अभियान २० ते २६ फेब्रुवारी दरम्यान कार्यशाळा होत आहे. कार्यशाळेच्या प्रथम दिवशी विद्यार्थ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली. डॉ. दीपराज शिंदेनी आरोग्यवर्धिनीच्या विविध विभागांची माहिती दिली.

Hello Dhule
Page No. 3 Feb 24, 2024
Powered by: erelego.com

सकाळ TODAY



**म्हसदी :** प्राथमिक आरोग्य केंद्रात आत्मनिर्भर युवती अभियानात सहभागी विद्यार्थी.

# आत्मनिर्भर युवती अभियानात म्हसदीत सातदिवसीय कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. २२ : येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग पुरस्कृत युवती सभेंतर्गत आत्मनिर्भर युवती अभियान २० ते २६ फेब्रुवारीदरम्यान कार्यशाळा होत आहे.

कार्यशाळेच्या प्रथम दिवशी मंगळवारी (ता. २०) विद्यार्थ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली. डॉ. दीपराज शिंदे यांनी आरोग्यवर्धिनीच्या विविध विभागांची माहिती दिली. वैद्यकीय अधिकारी डॉ. जिज्ञासा अहिरे यांनी विद्यार्थिनींशी आरोग्यविषयक योजनेची माहिती देत संवाद साधला. वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल पवार यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य संजीव बी. गिरासे, उपप्राचार्य तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. उमेश गवई, महिला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. वनिता पवार, डॉ. दीपाली सोनवणे, डॉ. विशाल शिंदे उपस्थित होते.

पुण्य नगरी

# देवरे महाविद्यालयात मंगळवारी साहस कार्यशाळा

**म्हसदी** : येथील आर. डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात दि.५ ते ७ मार्च या कालावधीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व विद्यार्थी विकास विभाग अंतर्गत तीन दिवशीय साहस कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरु प्रा. डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे, नितीन झाल्टे, अमोल पाटील, धनदाई देवी तरूण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे उपस्थित राहतील. पहिल्या दिवशी एस. आय.टी. कॉलेज साक्रीचे प्राचार्य के. आर. ठाकरे व प्रा. एस.एन. पानपाटील यांचे व्याख्यान होईल. क्रीडा मार्गदर्शक धनंजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांसाठी ट्रेकिंग व जंगल सफर आयोजित केली आहे. रात्री स्मशानभूमीत जाऊन अंधश्रद्धा निर्मूलन बाबत जागरूकता निर्माण केली जाईल. दुसऱ्या दिवशी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांच्या उपस्थितीत लाठी प्रशिक्षण होईल. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे जितेंद्र सोनवणे व सहकारी यांचे व्याख्यान व प्रात्यक्षिक होईल. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक.प्रा.डॉ. जयेंद्र लेकुरवाळे उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी प्राचार्य संजीव गिरासे असतील. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. पवित्रा पाटील, प्रा. सुरेखा पालवे, डॉ. शिवाजी पाटील, जिल्हा वन अधिकारी नितीनसिंग, विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. विवेकानंद चव्हाण, धनदाई देवी तरूण ऐक्य मंडळाचे सचिव महेंद्र दौलत देवरे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती या कार्यशाळेचे समन्वयक डॉ. विठ्ठल साळुंखे यांनी दिली. संयोजन डॉ. विशाल शिंदे, डॉ. विलास मोरे, डॉ. गुलाबसिंग पावरा, डॉ. भाऊसाहेब काकडे, डॉ. मिलिंदकुमार देवरे, डॉ. विजय जाधव, प्रा. उमेश गवई, डॉ. दिपाली सोनवणे, रत्नाकर जाधव, सायली पाटील, दीपक भामरे यांनी केले आहे.

Smart Dhule Edition
Mar 4, 2024 Page No. 2

लोकमत

# देवरे महाविद्यालयात आजपासून साहस कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हसदी :** येथील प्रा.आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात ५ ते ७ मार्च या कालावधीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व विद्यार्थी विकास विभाग अंतर्गत तीन दिवसीय साहस कार्यशाळा आयोजित केली आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरु प्रा. डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे, नितीन झाल्टे, अमोल पाटील, सुभाष देवरे उपस्थित राहणार आहेत. पहिल्या दिवशी एस. आय.टी. कॉलेज साक्रीचे प्राचार्य के. आर. ठाकरे व एस.एन. पानपाटील यांचे व्याख्यान होईल. क्रीडा मार्गदर्शक धनंजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांसाठी ट्रेकिंग व जंगल सफर आयोजित केली आहे. रात्री स्मशानभूमीत जाऊन अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत जागरूकता निर्माण केली जाईल. दुसऱ्या दिवशी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांच्या उपस्थितीत लाठी प्रशिक्षण होईल. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे जितेंद्र सोनवणे व सहकारी यांचे व्याख्यान व प्रात्यक्षिक होईल.

Hello Dhule
Page No. 3 Mar 05, 2024
Powered by: erelego.com

सकाळ

# म्हसदी येथे उद्यापासून विद्यापीठस्तरीय कार्यशाळा

## कुलगुरू प्रा. डॉ. माहेश्वरी यांच्या हस्ते उद्‍घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. ३ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग पुरस्कृत येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात मंगळवार (ता. ५)पासून धनदाईदेवी मंदिराजवळ तीनदिवसीय विद्यापीठस्तरीय साहस कार्यशाळा होणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी, समन्वयक डॉ. विठ्ठल साळुंखे, संयोजक डॉ. विशाल शिंदेसह संयोजन समितीने दिली.

५ ते ७ मार्चदरम्यान कार्यशाळा होईल. मंगळवारी सकाळी अकराला उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते उद्‍घाटन होईल. आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे अध्यक्षस्थानी असतील. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे, नितीन झाल्टे, अमोल पाटील, धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष गजमल देवरे प्रमुख पाहुणे असतील. पहिल्या दिवशी साक्री येथील एसआयटी कॉलेजचे प्राचार्य के. आर. ठाकरे व प्रा. एस. एन. पानपाटील यांचे व्याख्यान होईल. साक्री येथील क्रीडा मार्गदर्शक धनंजय सोनवणे यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना ट्रेकिंग व जंगल सफर घडवून आणली जाईल. रात्री स्मशानभूमीत जाऊन अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत जागरूकता निर्माण केली जाणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे लाठी प्रशिक्षण देतील. धुळे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे जितेंद्र सोनवणे व सहकारी यांचे व्याख्यान व प्रात्यक्षिक सादर करतील. विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे दिले जाणार आहेत. कार्यशाळेचा समारोप विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांच्या उपस्थितीत होईल. प्राचार्य संजीव गिरासे अध्यक्षस्थानी असतील. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. पवित्रा पाटील, प्रा. सुरेखा पालवे, डॉ. शिवाजीराव पाटील, धुळे जिल्हा वनाधिकारी नितीन सिंग, विद्यार्थी विकास विभागाचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. विवेकानंद चव्हाण, धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे सचिव महेंद्र देवरे प्रमुख पाहुणे असतील, अशी माहिती कार्यशाळेचे समन्वयक डॉ. विठ्ठल साळुंखे यांनी दिली. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी संयोजक डॉ. विशाल शिंदे व संयोजन समितीचे सदस्य डॉ. विलास मोरे (कुसुंबा), डॉ. गुलाबसिंग पावरा (साक्री), डॉ. भाऊसाहेब काकडे, डॉ. मिलिंदकुमार देवरे, डॉ. विजय जाधव, प्रा. उमेश गवई, डॉ. दीपाली सोनवणे, रत्नाकर जाधव, सायली पाटील, दीपक भामरे प्रयत्न करीत आहेत. कार्यशाळेत धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील प्रत्येकी तीन-तीन विद्यार्थी-विद्यार्थिनी असे सुमारे दीडशे विद्यार्थी सहभागी होतील.

पुणे । मुंबई । कोल्हापूर । नाशिक । छत्रपती संभाजीनगर । सोलापूर । नागपूर । सातारा । जळगाव । नांदेड । अकोला । सांगली । अहमदनगर येथून प्रसिद्ध

SakalNews SakalMediaNews www.esakal.com 9881 598 815



राज्यांचा विकास हाच देशाचा विकास १०

सकाळ

देसाई यांची गुन्हे शाखेकडून चौकशी ९



धुळे | बुधवार, ६ मार्च २०२४ | किंमत ₹ ५ • आजचा अंक : धुळे, नंदुरबार जिल्हा : पाने १६ (१२+४)

# यापुढील अर्थव्यवस्था असणार ज्ञानाधारित

## प्रा. विजय माहेश्वरी : म्हसदी येथे तीनदिवसीय साहस कार्यशाळा सुरू

■ सकाळ वृत्तसेवा

**म्हसदी, ता. ५ : भारतीय अर्थव्यवस्था कृषिपूरक असली तरी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या काळात अनेक समीकरणे बदलली आहेत. शिक्षण व्यवस्थेतही त्यादृष्टीने बदल होणे अपरिहार्य असते. हाच दृष्टिकोन अधोरेखित करून नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आखण्यात आलेले आहे. बदलत्या ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला पूरक अशा शैक्षणिक धोरणातून विविध शाखेतील अभ्यासक्रमांमुळे एकविसाव्या शतकातील अर्थव्यवस्था ज्ञानावर आधारित असेल, असे प्रतिपादन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी यांनी आज येथे केले.**



**म्हसदी :** धनदाईदेवी मंदिराजवळ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या साहस कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी. शेजारी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, डॉ. विठ्ठल साळुंखे.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे धनदाईदेवी मंदिर परिसरात तीन दिवसीय साहस कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू माहेश्वरी बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष तथा धुळे येथील प्रसिद्ध नाक- कान- घसा तज्ज्ञ डॉ. संजयकुमार देवरे अध्यक्षस्थानी होते. धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजीराव पाटील, प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, माजी प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, समन्वयक डॉ. विठ्ठल साळुंखे उपस्थित होते. कार्यशाळेत धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील १४८ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभाग घेतला आहे. नव्या बदलत्या जगाला सामोरे जाण्यासाठी ज्ञान, माहिती आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालणे आवश्यक असल्याचे कुलगुरू माहेश्वरी यांनी स्पष्ट केले. शिस्त, स्वयंप्रेरणा, प्रामाणिक परिश्रम यातूनच उज्वल यश मिळते. आधुनिक समाजमाध्यमे जेवढी फायदेशीर, तेवढीच घातक देखील असल्याचेही ते म्हणाले. अनुभवाधिष्ठित शिक्षणातून व्यक्तिमत्त्व विकास साधला जाऊ शकतो. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो म्हणून समाजाभिमुख व सुसंस्कृत माणूस बनून समाजाचे ऋण फेडले पाहिजे अशी अपेक्षाही डॉ. देवरे यांनी व्यक्त केली. प्राचार्य संजीव गिरासे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विशाल शिंदे, डॉ. भाऊसाहेब काकडे, प्रा. उमेश गवई, डॉ. हेमंतकुमार पाटील, डॉ. संदीप नांद्रे यांनी परिश्रम घेतले. डॉ. मिलिंदकुमार देवरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विजय जाधव यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

# नवे शैक्षणिक धोरण ज्ञानवृद्धी अर्थ व्यवस्थेला पूरक

## कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी; म्हसदीत तीन दिवशीय कार्यशाळेचे उदघाटन



**म्हसदी :** भारतीय अर्थव्यवस्था कृषी पूरक असली तरी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या काळात अनेक समीकरणे बदललेली आहेत. शिक्षण व्यवस्थेतही त्या दृष्टीने बदल होणे अपरिहार्य आहे. त्या दृष्टीने नवीन शैक्षणिक धोरण आखण्यात आले आहे. या शैक्षणिक धोरणातून विविध शाखेतील अभ्यासक्रमांमुळे २१ व्या शतकातील अर्थव्यवस्था ही ज्ञानावर आधारित असल्याचे मत कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू विजय माहेश्वरी यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ तसेच विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय साहस कार्यशाळा धनदाई देवी मंदिर परिसरात आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे अध्यक्षस्थानी उपस्थित होते. धनदाई देवी तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजी पाटील, प्राचार्य प्रा.डॉ. संजीव गिरासे, माजी प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील १४८ विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी सहभाग घेतला. नव्या बदलत्या जगाला सामोरे जाण्यासाठी ज्ञान, माहिती आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालणे आवश्यक असल्याचेही कुलगुरू माहेश्वरी यांनी स्पष्ट केले. शिस्त, स्वयंप्रेरणा आणि प्रामाणिक परिश्रम यातूनच उज्वल यश मिळते. आधुनिक समाज माध्यमे जेवढी फायदेशीर तेवढीच घातक देखील आहेत. अनुभवाधिष्ठित शिक्षणातून व्यक्तिमत्व विकास साधला जाऊ शकतो. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो म्हणून समाजाभिमुख व सुसंस्कृत माणूस बनून समाजाचे ऋण फेडले पाहिजे असे मत अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य प्रा. संजीव गिरासे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. विशाल शिंदे, डॉ. भाऊसाहेब काकडे, प्रा. उमेश गवई, डॉ. हेमंतकुमार पाटील, डॉ. संदीप नांद्रे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मिलिंदकुमार देवरे यांनी तर आभार डॉ. विजय जाधव यांनी मानले.

Smart Dhule Edition
Mar 6, 2024 Page No. 3

पुण्य नगरी

# आयुष्यात अढळ राहण्यासाठी साहस गरजेचे–प्रा. जयेंद्र लेकुरवाळे



**म्हसदी :** सक्षमतेमधूनच साहस निर्माण होते. प्रत्येकाला आयुष्यात एकदा तरी संघर्षाला सामोरे जावेच लागते. प्रत्येकाच्या जीवनात संकटे येतात. त्यामुळे संघर्षाला अथवा संकटांना घाबरायचं नसतं. संकटांचा सामना करायचा जो सामना करतो तोच जीवनात यशस्वी होतो. जीवनात लढायचं असतं, खचायचं नसतं. स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी व आयुष्यात अढळ राहण्यासाठी साहस आवश्यक असते. परंतु साहसात अतिआत्मविश्वास नको असे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय विद्यार्थी विकास विभाग आयोजित तीन दिवसीय विद्यापीठ स्तरीय साहस कार्यशाळेचा नुकताच समारोप झाला.याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य संजीव गिरासे अध्यक्षस्थानी होते.विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.पवित्रा पाटील, प्रा. सुरेखा पालवे, डॉ. शिवाजी पाटील, विभागीय वनअधिकारी विनायक खैरनार, सहाय्यक वनरक्षक ज्ञानेश्वर अडकिने, विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. विवेकानंद चव्हाण, धनदाई देवी तरूण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, सचिव महेंद्र देवरे, संचालक रघुनाथ देवरे, काशिनाथ देवरे, हिम्मत देवरे आदी उपस्थित होते. विनायक खैरनार यांनी सांगितले की, ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते. मनुष्य आजन्म विद्यार्थी असतो. आपली स्पर्धा आपल्या स्वतःशीच असते. आपल्या क्षमता ओळखून त्या क्षमतांचा विकास करा. संघर्षातून मिळालेल्या यशाचे महत्व अधिक असते असेही त्यांनी सांगितले. प्रा. सुरेखा पालवे यांनी आपल्यातील असामान्यत्व सिद्ध करणे म्हणजे साहस. निर्भयतेमधून साहस निर्माण होते. आपल्या सकारात्मक कृतीतून साहस प्रतिबिंबित होते असे मत व्यक्त केले. डॉ. पवित्रा पाटील व डॉ. विवेकानंद चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील १५२ विद्यार्थी सहभागी झाले होते. याप्रसंगी ललित पाटील, हर्षिता देवरे, प्रमोदकुमार चौरसिया, सपना ठाकरे या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेच्या नियोजनाविषयी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य संजीव गिरासे यांनी कार्यशाळेतील विद्यार्थ्यांच्या ट्रेकिंग, स्मशानभूमी भेट या साहसी कृतींचे कौतुक केले. स्वतःच्या अस्तित्व निर्माण करून जगण्या लायक व्हा असे आवाहन केले. विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विठ्ठल साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. विशाल शिंदे यांनी केले तर आभार डॉ. भाऊसाहेब काकडे यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. विलास मोरे (कुसुंबा), डॉ. गुलाबसिंग पावरा (साक्री), डॉ. मिलिंदकुमार देवरे, डॉ. विजय जाधव, डॉ. दिपाली सोनवणे, डॉ. वनिता पवार, प्रा. उमेश गवई, प्रा. सिध्दार्थ ईखारे, डॉ. जगदीश तोरवणे, डॉ. ऋषिकेश चित्तम, डॉ. संदीप नांद्रे, डॉ. हेमंत नांद्रे, प्रा. योगेश मासुळे, रत्नाकर जाधव, जितेंद्र देवरे, दीपक भामरे, सायली पाटील, महाविद्यालयाचे स्वयंसेवक, कमवा व शिका योजनेचे विद्यार्थी आदींनी परिश्रम घेतले.

Dhule Edition
Mar 11, 2024 Page No. 3

सकाळ TODAY

# स्वअस्तित्वासाठी साहस आवश्यक, पण अतिआत्मविश्वास नको

## प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे : विद्यापीठस्तरीय तीनदिवसीय 'साहस' कार्यशाळेचा समारोप

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. ९ : जो साहसी असतो, तो राजा होतो. सक्षमतेमधूनच साहस निर्माण होते. प्रत्येकाला आयुष्यात संघर्षाला सामोरे जावे लागते. प्रत्येकाच्या जीवनात संकटे येतात; परंतु संघर्षाला घाबरायचे नसते. संकटांचा सामना करणारेच जीवनात यशस्वी होतात. जीवनात लढायचे असते, खचायचे नसते. स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी साहस आवश्यक असते. साहसात अतिआत्मविश्वास नको, असे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थी विकास विभागातर्फे धनदाईदेवी मंदिराजवळ झालेल्या तीनदिवसीय विद्यापीठस्तरीय साहस कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी



म्हसदी : धनदाईदेवीजवळ विद्यापीठस्तरीय तीनदिवसीय साहस कार्यशाळेच्या समारोपात मार्गदर्शन करताना विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे.

ते बोलत होते. प्राचार्य संजीव गिरासे अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. पवित्रा पाटील, प्रा. सुरेखा पाल्वे, डॉ. शिवाजी पाटील, विभागीय वन अधिकारी विनायक खैरनार, सहाय्यक वनरक्षक ज्ञानोबा अडकिले, विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. विवेकानंद चव्हाण, धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, उपाध्यक्ष के. एन. देवरे, सचिव महेंद्र देवरे, संचालक रघुनाथ देवरे, यशवंतराव देवरे, हिंमतराव देवरे उपस्थित होते. विनायक खैरनार यांनी ज्ञान वाढते, मनुष्य आजन्म विद्यार्थी असतो, आपली स्पर्धा आपल्या स्वतःशीच असते, आपल्या क्षमता ओळखून त्या क्षमतांचा विकास करा, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा. सुरेखा पाल्वे यांनी आपल्यातील असामान्यत्व सिद्ध करणे म्हणजे साहस. निर्भयतेमधून साहस निर्माण होते, आपल्या सकारात्मक कृतीतून साहस प्रतिबिंबित होत असल्याचे स्पष्ट केले. डॉ. पवित्रा पाटील, डॉ. विवेकानंद चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील १५२ विद्यार्थी सहभागी झाले होते. ललित पाटील, हर्षिता देवरे, प्रमोदकुमार चौरसिया, सपना ठाकरे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य गिरासे यांनी कार्यशाळेतील विद्यार्थ्यांच्या ट्रेकिंग, स्मशानभूमी भेट या साहसी कृतींचे कौतुक केले. स्वतःचे अस्तित्व निर्माण करून जगण्याच्या लायक व्हा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. विद्यार्थी विकास विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विठ्ठल साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विशाल शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. भाऊसाहेब काकडे यांनी आभार मानले. प्रा. विलास मोरे(कुसुंबा), डॉ. गुलाबसिंग पावरा (साक्री), डॉ. मिलिंदकुमार देवरे, डॉ. विजय जाधव, डॉ. दीपाली सोनवणे, डॉ. वनिता पवार, प्रा. उमेश गवई, प्रा. सिद्धार्थ इखारे, डॉ. जगदीश तोरवणे, डॉ. हृषीकेश चित्तम, डॉ. संदीप नांद्रे, डॉ. हेमंत नांद्रे, प्रा. योगेश मासुळे, रत्नाकर जाधव, जितेंद्र देवरे, दीपक भामरे, सायली पाटील, स्वयंसेवक, कमवा-शिका योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

दिव्य मराठी धुळे सिटी 09-03-2024

मोलाचा सल्ला • प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांचे मत, म्हसदीला देवरे महाविद्यालयात साहस कार्यशाळा

# साहस असावे पण जास्त आत्मविश्वास नसावा

प्रतिनिधी | म्हसदी

सक्षमतेतून साहस निर्माण होते. प्रत्येकाला आयुष्यात संघर्षाला सामोरे जावे लागते. प्रत्येकाच्या जीवनात संकटे येतात. पण संघर्षाला घाबरायचा नसत. संकटांचा सामना करणारे जीवनात यशस्वी होतात. स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी साहस आवश्यक असते. पण साहसात अति आत्मविश्वास नसावा, असे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागातर्फे तीन दिवसीय विद्यापीठस्तरीय साहस कार्यशाळा झाली. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य संजीव गिरासे होते. या वेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या डॉ. पवित्रा पाटील, प्रा. सुरेखा पाल्वे, डॉ. शिवाजी पाटील, विभागीय वन अधिकारी विनायक खैरनार, विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. विवेकानंद चव्हाण, धनदाई देवी तरूण ऐक्य मंडळाचे सचिव महेंद्र दौलत देवरे, अध्यक्ष सुभाष गजमल देवरे आदी उपस्थित होते. विनायक खैरनार म्हणाले की, ज्ञान दिल्याने ते



देवरे महाविद्यालयातील साहस कार्यशाळेत समारोप प्रसगी बोलतांना प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे

वाढते. मनुष्य आयुष्यभर विद्यार्थी असतो. त्यामुळे आपल्या क्षमता ओळखून त्यांचा विकास करा. संघर्षातून मिळालेल्या यशाचे महत्त्व जास्त असेही ते म्हणाले. कार्यशाळेत धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील १५२ विद्यार्थी सहभागी झाले होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विठ्ठल साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. विशाल शिंदे यांनी केले. आभार डॉ. भाऊसाहेब काकडे यांनी मानले.

लोकमत

## आत्मनिर्भर युवती अभियान कार्यशाळा

**म्हसदी :** अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग पुरस्कृत युवती सभेंतर्गत आत्मनिर्भर युवती अभियान २० ते २६ फेब्रुवारी दरम्यान कार्यशाळा होत आहे. कार्यशाळेच्या प्रथम दिवशी विद्यार्थ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली. डॉ. दीपराज शिंदेनी आरोग्यवर्धिनीच्या विविध विभागांची माहिती दिली.

Hello Dhule
Page No. 3 Feb 24, 2024
Powered by: erelego.com

सकाळ TODAY



**म्हसदी :** प्राथमिक आरोग्य केंद्रात आत्मनिर्भर युवती अभियानात सहभागी विद्यार्थी.

# आत्मनिर्भर युवती अभियानात म्हसदीत सातदिवसीय कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. २२ : येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग पुरस्कृत युवती सभेंतर्गत आत्मनिर्भर युवती अभियान २० ते २६ फेब्रुवारीदरम्यान कार्यशाळा होत आहे.

कार्यशाळेच्या प्रथम दिवशी मंगळवारी (ता. २०) विद्यार्थ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट दिली. डॉ. दीपराज शिंदे यांनी आरोग्यवर्धिनीच्या विविध विभागांची माहिती दिली. वैद्यकीय अधिकारी डॉ. जिज्ञासा अहिरे यांनी विद्यार्थिनींशी आरोग्यविषयक योजनेची माहिती देत संवाद साधला. वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल पवार यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य संजीव बी. गिरासे, उपप्राचार्य तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. उमेश गवई, महिला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. वनिता पवार, डॉ. दीपाली सोनवणे, डॉ. विशाल शिंदे उपस्थित होते.